**(CNR NO.MHSNO-40001812025)**

**नियमित दिवाणी अपिल क्रमांक १६/२०२५**

**नि.५ वर आदेश**

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ४४०/२०१८ मधील प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी प्रस्तुतचे अपील, न्यायालयाचा दावा मंजूर करण्याचा आदेश व हुकूमनाम्याविरुद्ध दाखल केलेला आहे. अपीलार्थिंनी प्रस्तुतचा अर्ज सदर न्यायनिर्णय व हुकूमनाम्यास स्थगिती मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. अपील दाखल झाल्यानंतर मूळ जाबदार म्हणजेच मूळ वादी सर्जेराव काळुगडे मयत झाल्याने त्यांचे वारसदार अपिलामध्ये सामील करण्यात आलेले आहेत. मात्र त्यांना अपिलाची नोटीस मिळूनही ते हजर झाले नाहीत व त्यांनी स्थगिती अर्जावर खुलासा सादर केला नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालवण्यात आला.

३. अपिलार्थींच्या विद्वान वकिलांचा रितसर युक्तिवाद ऐकण्यात आला. विद्वान वकिलांनी दरम्यानच्या काळात प्रस्तुत अर्ज त्वरित निर्णय होण्याकरिता दिनांक ०६/१०/२०२५ रोजी प्रकरण बोर्डावर घेण्याची प्रार्थना करून त्यांना दिनांक ०३/१०/२०२५ रोजी महावितरण कंपनीकडून आलेली नोटीस सादर केली व स्थगिती मिळण्याकरिता प्रथमदर्शनी दावा त्यांच्या बाजूने असल्याबाबत दाव्यातील दिनांक २२/१०/२०१८ रोजीचा नकाशा, दिनांक १४/१२/२०१६ रोजीचा पंचनामा व दिनांक १५/१२/२०१८ रोजीचे विजेचे बिल दाखल केले.

४. जाबदारांना नोटीस लागूनही त्यांनी स्थगिती अर्जावर खुलासा दिला नाही. दावा संचिकेचे वाचन केले असता वादींनी प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीकरिता व उद्घोषणा करिता दाखल केला होता असे दिसते. दावा मिळकत ‘अ’ ही गट नंबर ६८९ असून दावा मिळकत ‘ब’ ही मिळकत ‘अ’ च्या पूर्व बाजूला असलेली विहीर आहे असे दाव्यात

नमूद करण्यात आले आहे. सदर विहीर दावा मिळकत ‘ब’ ही दावा मिळकत ‘अ’ चा हिस्सा असल्याबाबत उद्घोषणा व निरंतर ताकीद वादींनी मागितली होती व न्यायालयाने तो दावा मंजूर केलेला आहे.

५. अपिलार्थी/प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादींनी गट क्रमांक ६८९ मधे विहीर असल्याची बाब सिद्ध केली नाही व त्यामुळे गट क्रमांक ६८९ मध्ये विहीर असल्याची उद्घोषणा करून मागता येत नव्हती. शिवाय प्रतिवादींनी निशाणी ६० वर असलेला पंचनामा शाबित केला होता व त्यानुसार वादातीत विहीर गट क्रमांक ६८७ मध्येच आहे. अपीलार्थिंनी तो पंचनामा अपीलामध्ये सादर केला आहे व गट क्रमांक ६८९ मध्ये असलेल्या विहिरीची नोंद पोकळ होती म्हणून पंचनामा करण्यात आला असे नमूद केले आहे.

६. सद्यस्थितीत महावितरण कंपनीने दिनांक ०३/१०/२०२५ रोजी प्रतिवादींच्या नावे असलेल्या वीज जोडण्यांचा वीज पुरवठा खंडित करावा की नाही, यासंदर्भात कागदपत्रे मागवण्यासाठी प्रतिवादींशी कागदोपत्री संपर्क केला व यावरूनच प्रतिवादींचा दावा मिळकत विहिरीवरील वीज पुरवठा खंडित केला जाण्याची पूर्ण शक्यता आहे. अशा स्थितीत संपरीक्षा न्यायालयाच्या न्यायनिर्णयास स्थगिती न दिल्यास अपिलार्थींचे अपरिमित नुकसान होईल, असे अपिलार्थींच्या विद्वान वकिलांनी कथन केले आहे.

७. या अनुषंगाने मी सर्वप्रथम संपरीक्षा न्यायालयाचा न्यायनिर्णय वाचला. त्यात प्रतिवादींनी म्हणजेच अपिलार्थींनी नमूद केलेल्या दिनांक १४/१२/२०१६ रोजीच्या पंचनामाचा संदर्भ आहे. या मंडल अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याच्या आधारे तहसीलदारांनी कुठलाही आदेश केलेला नसल्यामुळे केवळ त्या पंचनामाच्या आधारे दावा मिळकत ‘ब’ म्हणजेच विहीर ही गट क्रमांक ६८७ मध्ये आहे, असे म्हणता

येणार नाही, अशी कारणमीमांसा संपरीक्षा न्यायालयाने केलेली आहे. तसेच वादींनी दाखल केलेल्या निशाणी क्रमांक १०२ व १०३ वरील खरेदीखतांमधील मजकूरावर देखील विश्वास ठेवलेला आहे. त्यानुसार जुना सिटी सर्वे क्रमांक १६९/९क म्हणजेच गट क्रमांक ६८९ यातील समाइकातील ४ आणा ६ पै हिस्सा व विहीर धावपाट........ विहिरीची पारी..... इतका हिस्सा वादीस खरेदी खताने दिल्याचे दिसते. ही खरेदी खते १९६७ व १९६९ सालची आहेत.

८. प्रथमदर्शनी तरी संपरीक्षा न्यायालयाने सर्व कागदपत्रांचा विचार करून न्यायनिर्णय दिलेला दिसतो. शिवाय दिनांक ०३/१०/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपीलार्थींचा वीजपुरवठा खंडित केला जाणार आहे, असे त्या पत्रावरून दिसून येत नाही. क्रम ४१ नियम ५ नुसार अपिलार्थीने अपील यशस्वी होण्याची शक्यता, सोयीचा समतोल व स्थगिती न दिल्यास होऊ घातलेले अपरिमित नुकसान सिद्ध करायला हवे. सद्यस्थितीत अपिलार्थींनी स्थगिती मिळवण्यासाठी आवश्यक त्या बाबींचे समाधानकारक स्पष्टीकरण दिल्याचे दिसून येत नाही व म्हणून संपरिक्षा न्यायालयाच्या न्यायनिर्णयास स्थगिती देणे योग्य होणार नाही, असे अनुमान मी काढले. म्हणून खालील आदेश पारित करण्यात आला.

**<u>आदेश</u>**

अर्ज नि. ५ नामंजुर करण्यात येतो.

ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR

Digitally signed by ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR
Date: 2025.11.12 14:52:02 +0530

दि.०३/११/२०२५ (श्रीमती ए. एच. काशीकर),

तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व अति. सत्र न्यायाधीश-१,

इस्लामपूर.

**Certificate**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of Stenographer : S.W.Pathan [Grade-1]
Court : Adhoc-District Judge-1, Islampur.
Date : 03/11/2025.
Order signed by the
Presiding Officer : 03/11/2025.
Order uploaded on : 03/11/2025.